




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे | अंक : २७९ वा | बुधवार दि. ०८ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# एसीबीच्या गळाला टेकाळे नावाचा मासा लागेना!

## अवैध संपत्तीची चौकशी यंत्रणा करेना!

**भ्रष्टचारातून कमावलेली करोडो रुपयांची चल - अचल संपत्तीचे शेकडो सातबारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) ला देऊनही बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांच्यावर कारवाईस संबंधित प्रशासन हतबल का असा प्रश्न जोर धरीत आहे**




जनसंचलन/ बुलढाणा

महसूल मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे या भ्रष्टाचाऱ्याची पुराव्यानिशी तक्रार दाखल करून त्यांच्या नावे असलेल्या करोडो रुपयांच्या संपत्तीची खूली चौकशी मागील काही महिन्यांपासुन सुरू होऊनही अद्याप पर्यंत मंडळ अधिकारी महाभ्रष्टचारी विजय टेकाळेंवर शासकीय कारवाई करण्यास एवढी दिरंगाई का असा प्रश्न सुज्ञ नागरिकांमध्ये जोर धरीत आहे. करण्याची मागणी एका तक्रारदाराने आता एसीबीला स्मरणपत्र दिले असून कारवाईचा घोडा कुठे अडला? हा प्रश्ननिर्माण झाला आहे. पोलिस उपअधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांना बुलढाण्याचे मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे त्यांची पत्नी ज्योती विजय टेकाळे व त्यांचे इतर नातेवाईक यांचे नावे असलेल्या करोडो रूपयाच्या संपत्तीची खुली चौकशी करणेबाबत६फेब्रवारी२०२३व२९एप्रिल२०२४ रोजी एका तक्रारदाराने तक्रार अर्ज दाखल केले होते. आता ७ जानेवारी २०२५ रोजी स्मरण पत्र देण्यात आले.या तक्रारीत म्हटले आहे की, बुलडाणा येथील मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे, त्यांची पत्नी ज्योती विजय टेकाळे व त्यांचे इतर नातेवाईक यांचे नावे असलेल्या करोडो रुपयाच्या संपत्तीची खुली चौकशी करणे करिता सर्व पुराव्यानिशी यापूर्वीच तक्रार अर्ज सादर केलेले आहेत.मात्र बराच अवधी लोटून गेला असून त्यावर आजपावेतो कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही.आतापर्यंत अर्जावर नियमाप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये आपल्या स्तरावरुन संबंधीतांच्या संपत्तीची चौकशी केली किंवा नाही ? याबाबत तक्रारदाराला कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे हा मासा एसीबीच्या गळाला केव्हा लागेल? आणि भ्रष्टाचार चव्हाट्यावर कधी येईल याकडे अनेकांचे लक्ष केंद्रित आहे.

# बापरे! बुलढाणा जिल्ह्यात टक्कल व्हायरसचा मोठा थैमान, 3 दिवसांतच पडतंय टक्कल!...

## नेमका आता हा काय प्रकार आहे?

जनसंचलन/ शेगाव

शेगाव तालुक्यात केस गळतीमुळे नागरिक भयभीत झाले आहे. वेगळ्या व्हायरसची एन्ट्री झाली का? अशी भीती नागरिकांमध्ये आहे. बुलढाण्यातली शेगाव तालुक्यात काही गावामधे नागरिकांना केसगळतीची समस्या जाणवत आहे. तीन दिवसांतच टक्कल पडत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. अनेकांनी खासगी रूग्णालयाची वाट धरली आहे, मात्र अद्याप हे का होतेय, याचं कारण समजू शकले नाही. शेगाव तालुक्यातील बोंडगाव, कालवड, हिंगणा या गावात या अज्ञात व्हायरसने थैमान घातले आहे. या विषाणूची कुटुंब ची कुटुंब बळी ठरत आहेत. अगोदर डोके खाजवणे, नंतर हातात सरळ केस येणे आणि तिसऱ्या दिवशी चक्क टक्कल पडतोय. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सरकारचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये भीती - या अज्ञात विषाणूमुळे बोंडगाव, कालवड, हिंगणा या तिन्ही गावातील शेकडो नागरिकांची केस गेली आहेत. धक्कादायक म्हणजे, यामध्ये महिलांची संख्याही लक्षणीय आहे. मात्र एवढ्या भयंकर प्रकार होऊनही आरोग्य विभाग अनभिज्ञ आहे, त्यामुळे नागरिक खासगीत उपचार घेत आहेत. शाम्पू वापरल्यामुळे असा प्रकार घडत असावा असे काही डॉक्टरांचे मत आहे. पण कधीही आयुष्यात शाम्पू न वापरणाऱ्या नागरिकांचेही केस जात असल्याने नागरिकांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे. बुलढाणा जिल्हा आरोग्य अधिकारी यांना शेगाव तालुका शिवसेनाप्रमुख रामेश्वर थारकर यांनी निवेदन देऊन या गंभीर बाबीची दखल घेऊन त्वरित सदर गावांमध्ये उपचार शिबिरे राबवण्याचे आवाहन केले आहे. या गावामधे आरोग्य विभागाने कोणतीही ठोस उपाय योजना केली नव्हती. कालवड, बोंडगाव व हिंगणा या गावामधे केस गळतीची समस्या नागरिकांना जाणवत असून आपोआप



टक्कल पडत आहे. याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ गीते यांना निवेदन दिले आहे. आता सरकारकडून काय पावले उचलली जा-तात, याकडे नागरीक डोळे लावून बसले आहे.

# भाजयुमो बुलढाणा शहर वतीने भाजप संघटन पर्व सदस्य नोंदणी कॅम्प संपन्न

जनसंचलन/बुलढाणा



भारतीय जनता पार्टी संघटन पर्व २०२४ अंतर्गत भाजपच्या वतीने संपूर्ण भारतभर सक्रिय सदस्य नोंदणी सुरू आहे त्या अंतर्गत भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने सक्रिय सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप दादा मोरे यांनी केले होते. त्या अनुषंगाने आज भारतीय जनता युवा मोर्चा बुलढाणा शहर च्या वतीने सदस्य नोंदणी कॅम्प घेण्यात आला. स्थानिक स्टेट बँक चौक शाखा बुलढाणा पुढे भाजयुमो शहर वतीने कॅम्प चे आयोजन केले होते.सदर कॅम्पला महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक युवती, अनेक तरुण तरुणी व भाजपाचे आवड असलेले अनेक नागरिक यांनी सदस्य होऊन या सहभाग नोंदवला. या पक्ष उपयोगी मोहिमेत सहभागी होऊन १००० सदस्य लिंक द्वारे जोडून पूर्ण झाले आहेत. आदरणीय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी, देशाचे गृहमंत्री अमित जी शहा व राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा जी तसेच महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, साहेब प्रभारी रवींद्रजी चव्हाण साहेब , महामंत्री विक्रांत दादा पाटील, भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप दादा मोरे , बुलढाणा जिल्ह्याचे कॅबिनेट मंत्री आकाश दादा फुंडकर, दमदार आमदार श्वेताताई महाले , आमदार चैनसुख जी संचेती , आमदार संजय जी कुटे, जिल्हाध्यक्ष गणेश जी मांटे, जिल्हा अध्यक्ष सचिन जी देशमुख, भाजयुमो प्रदेश महामंत्री बादल जी कुलकर्णी, प्रदेश सचिव शिवराज जी जाधव व राम जी मिश्रा , यांच्या मार्गर्शनाखाली तसेच जिल्हाध्यक्ष युवा मोर्चा विनायक जी भाग्यवंत तसेच जिल्हा संघटन मंत्री वैभव जी लाड , शहर अध्यक्ष प्रतीक गायकवाड, शहर उपाध्यक्ष शुभम बिबे यांच्या नेतृत्वात सदर कॅम्प घेण्यात आला.सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी प्रतीक गायकवाड, शुभम बीबे ,सुमेध वानखेडे ,निखिल गवई,सुशील गोरे,विजय तोमर ,सुनील पोफळघट,शुभम महाले आदी कार्यकर्ते यांनी मेहनत घेतली.

# जिल्हा हिवताप कार्यालयाचे कर्मचारी रजा आंदोलनाच्या पावित्र्यात..

## डॉ. तांगडे यांना अतिरिक्त पदभार देण्यात येऊ नये केली मागणी.

जनसंचलन/बुलढाणा



महाराष्ट्र राज्य आरोग्य कर्मचारी संघटनेने डॉ.तांगडे यांना जिल्हा हिवताप अधिकारी या पदाचा पदभार देण्यात येवू नये जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहेत.. मात्र असे असतानाही काल डॉ. तांगडे यांना जिल्हा हिवताप कार्यालयाचा पदाचा प्रभार सोपविण्यात आला आहे त्यामुळे जिल्हा हिताब कार्यालयातील २१८ कर्मचारी रजा आंदोलन करणार असल्याचे आज सांगितले आहे.. यावेळी जिल्हयातील कोणत्याही वैद्यकिय अधिकारी यांचेकडे सोपविल्यास कर्मचा-याची हरकत राहणार नाही. तर डॉक्टर तांगडे यांना या उपरही पदाचा प्रभार दिल्यास भविष्यात जिल्हयातील हिवताप कर्मचा-यामध्ये असंतोष निर्माण होऊन काम बद,अहवाल बद आंदोलन व सामुहिक रजा,उपाषण वा इतर मार्गांचा अवंलब करतील असे कर्मचाऱ्यांनी सांगितले आहे..

# नगर परिषदेच्या हलगर्जीपणाचा फटका १० कोटींच्या भूखंडाचा लिलाव!

जनसंचलन/मलकापूर




नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारत व व्यापारी संकुलाच्या बांधकामाचे ७० लाख रुपये देयक न दिल्याने, नागपूर उच्च न्यायालयाने मलकापूर नगर परिषदेच्या मालकीच्या भूखंडाचा १० कोटींहून अधिक रक्कमेचा लिलाव २७ जानेवारी २०२५ रोजी ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मे. खरे अँड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नागपूर या कंत्राटदार कंपनीने ७० लाख रुपयांसाठी वारंवार मागणी केली. मात्र नगर परिषदेने देयक न दिल्याने कंपनीने न्यायालयात धाव घेतली. लवादाने संबंधित रक्कम व वार्षिक १८% व्याज देण्याचे आदेश दिले. परंतु, नगर परिषदेने ना आदेश पाळले, ना रक्कम दिली. न्यायालयाने याप्रकरणी कारवाई करत बुलढाणा रोडवरील महत्त्वाचा भूखंड लिलावासाठी ठेवण्याचा आदेश दिला. २७ जानेवारी रोजी होणाऱ्या लिलावाद्वारे १० कोटी २४ लाख रुपये वसूल होणार आहेत. नगर परिषदेच्या दुर्लक्षामुळे हा भूखंड गमावण्याची वेळ आली आहे.

# दुचाकीच्या अपघातात दोन सख्खे भाऊ गंभीर

जनसंचलन/जळंब




पारखेड फाट्यावर दुचाकीला अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेमध्ये जलंब मधील दोन सख्खे भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना ७ जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजता घडली. - या अपघातात दुचाकी चालकाची प्रकृती सुखरूप आहे. घटनेमुळे - गावात खळबळ उडाली आहे. गावातील महादेव अवचार आणि रामदास अवचार हे सख्खे भाऊ - अक्षय बबन अवचार याच्यासोबत दुचाकीने पारखेड येथे दुपारी चार वाजता गेले होते. सायंकाळी जलंबकडे येताना पारखेड फाट्यावर ते आले. त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. दुचाकीच्या मधोमध बसलेल्या या धडकेमध्ये दोन्ही सख्खे भाऊ हवेत उडाले. तर दुचाकीचालक अक्षय हा दुसऱ्या बाजूला दुचाकीसोबत पडला. या अपघातात महादेव अवचार आणि रामदास अवचार हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने खामगावच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर त्यांच्यावर अकोला येथे उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. घटनेचा तपास पोलिस करीत आहेत.



# ज्येष्ठ पत्रकार राजेश डिडोळकर यांची जिल्हा समन्वयक पदी निवड...

**जनसंचलन/बुलढाणा**

पत्रकार संघटनांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषेशी संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीचा विस्तार सुरु असून ज्येष्ठ पत्रकार राजेश डिडोळकर यांची पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या जिल्हा समन्वयकपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. जिल्हा पत्रकार भवनमध्ये बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या एका बैठकीत साप्ताहिक ज्ञानवर्धिनीचे संपादक तथा ङ्गद हितवादफ चे जिल्हाप्रतिनिधी राजेश डिडोळकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. अनुभवी आणि अभ्यासक पत्रकार म्हणून नावलौकिक असलेले राजेश डिडोळकर आता पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या जिल्हा समन्वयकपद भूषविणार आहेत.




याप्रसंगी बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष वसीम शेख, सचिव कासिम शेख, सहसचिव शिवाजी मामनकर तसेच जितेंद्र कायस्थ, इसरार देशमुख, अजय राजगुरे, प्रकाश जेऊघाले यांची उपस्थिती होती. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांनी जिल्हा समन्वयक श्री डिडोळकर यांचे स्वागत केले. सन १९८९ पासून मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये पत्रकारिता करणारे राजेश डिडोळकर यांचा जिल्हाभर नावलौकिक आहे.

# भारतीय पत्रकार महासंघच्या वतीने गरजूंना स्वेटर वाटून पत्रकार दिन साजरा...

**जनसंचलन/ चोपडा**

येथील भारतीय पत्रकार महासंघ कडून मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थी यांना स्वेटर वाटून पत्रकार दीन साजरा करण्यात आला. त्यावेळी आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होते. भारतीय पत्रकार महासंघ चे प्रकाश सरदार यांनी समजा बद्दल पत्रकारितेचे जबाबदारी काय आहे व पत्रकार कसा असावा याबद्दल मार्गदर्शन केले. तर प्रमुख अतिथी भारतीय पत्रकार महासंघ चे केंद्रीय सचिव प्रदीप पाटील, उपाध्यक्ष राकेश कोल्हे, प्रकाश सरदार, रेल्वे क्राईम चे संपादक शकील पटेल, दैनिक बातमीदार चे संपादक हेमंत पाटील, तहसीलदार भाऊसाहेब थोरात, शहर पोलिस निरीक्षक मधूकर साळवे ,पोलिस



निरीक्षक कावेरी कमलाकर, संस्था अध्यक्ष लिला पाकळे, मुख्यध्यापक नम्रता धनगर,रोटरी क्लब चे एम. डब्लू. पाटील, चेतन पाटील, पवन गुजराथी इत्यादी मान्यवरांच्या हस्ते मुखबाधिर विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन विभागीय अध्यक्ष विलास पाटील, तालुका प्रतिनिधी सचिन जयस्वाल, तालुका सूर्यवंशी यांनी केले होते. तर कार्यक्रम करिता निलेश महाजन, राकेश पाटील, यांनी परिश्रम घेतले आणि सुत्र संचालन व आभारप्रदर्शन भावलाल पाकळे यांनी केले.

# अस्वलाच्या हल्ल्यात महिला जखमी

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतात तूरची सोंगणी करीत असताना अस्वलाने ३५ वर्षीय महिलेवर हल्ला केला. त्यामध्ये महिला गंभीर जखमी झाली आहे. ही घटना मंगळवार, ७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. जखमी महिलेवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. चिखली तालुक्यातील डोंगर शेवली येथील अश्विनी विनोद सावळे (३२) ह्या सकाळी शेतात गेल्या होत्या. तुरीची सोंगणी करीत असताना दबा धरून बसलेल्या अस्वलाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. अश्विनी सावळे यांचा आवाज ऐकून आजूबाजूच्या



शेतात काम करणारे शेतकरी मदतीसाठी धावले. शेतकऱ्यांचा आरडाओरडा ऐकल्याने अस्वलाने तेथून पळ काढला. नातेवाइकांनी जखमी अश्विनी सावळे यांना बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. घटनेची माहिती मिळताच अश्विनी आपटे, आरएफओ अभिजित ठाकरे, प्रफुल मोरेंनी रुग्णालयात जाऊन महिलेची भेट घेतली.




# बुलढाणा, मोताळा आणि चिखली तालुक्यांना दुष्काळग्रस्त घोषित करा :- ॲड.जयश्री शेळके



**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा जिल्ह्यातील उर्वरित बुलडाणा, मोताळा आणि चिखली तालुक्यांना सुध्दा दुष्काळग्रस्त घोषित करण्यात यावे अशी मागणी शिवसेना (उबाठा) नेत्या ॲड.जयश्री शेळके यांनी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हा महसूल प्रशासनाकडून नुकतीच १४२० गावांची अंतिम आणेवारी जाहिर करण्यात आली. जिल्ह्याची खरिप हंगामातील परिस्थिती दुष्काळसदृश असून यामध्ये १० तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे. परंतु बुलढाणा, मोताळा आणि चिखली तालुक्यांची आणेवारी ५० पैशांच्यावर आल्याने या तिन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. यावर्षी जिल्ह्यात खरिप हंगामात ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात तर काही भागात ऑक्टोबर महिन्यातसुध्दा मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. त्यामुळे हजारो हेक्टरवरील सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग या पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची भरपाई अजूनही जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना मिळालेली नाही. भावफरकाच्या मदतीपासूनही अनेक शेतकरी आजतयागत वंचित आहेत. कित्येक शेतकऱ्यांना अजूनही पिकविम्याची रक्कम मिळालेली नाही. खरिप हंगामात मोताळा तालुक्यातील कपाशीचे लाल्या रोगामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बुलढाणा आणि चिखली तालुक्यात सोयाबीनचे एकरी उत्पादन घटले तसेच पिकांना योग्य बाजारभाव मिळाला नाही. अशातच जिल्हा महसूल विभागाने जाहिर केलेल्या आणेवारीत बुलढाणा, चिखली आणि मोताळा तालुक्याची आणेवारी ५० पैशाच्यावर दाखवल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे. त्यामुळे प्रशासनाने बुलढाणा, मोताळा आणि चिखली तालुक्यातील शेतकऱ्यांचा सहानुभूतीपुर्वक विचार करावा. तसेच या तिन्ही तालुक्यांना दुष्काळग्रस्त घोषित करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी शिवसेना (उबाठा) नेत्या ॲड.जयश्री शेळके यांनी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# दररोज १ कोटीची ऑनलाईन खरेदी!

## गावातला पैसा गावातून गायब!



जनसंचलन/मेहकर

छोटा-मोठा व्यापारी टिकवायचे असेल तर ऑनलाईन शॉपिंग बंद करा! मेहकर(हॅलो बुलढाणा) सुरूवातीच्या काळात ऑनलाईन शॉपिंगला महत्त्व नसल्याने सर्व प्रकारची खरेदी स्थानिक व्यापाऱ्यांकडे होत होती व बाजारपेठेत चांगल्या प्रकारे आर्थिक उलाढाल होत होती. परंतु गेल्या काही वर्षात ऑनलाईन खरेदीचे प्रमाण शहरी भागासह ग्रामीण भागात देखील वाढल्याने मेहकरच्या बाजारपेठेवर ऑनलाईन शॉपिंगचा दुष्परिणाम दिसून येत आहे.ॲमोझॉन,फ्लपकार्टा,मिशो,नायका,मिनत्रा अशा हव्या असले विविध ई-कॉमर्सच्या माध्यमातून मेहकर शहरातून दररोज तब्बल दिवसाला १ कोटी रुपये बाहेर जात असल्याने सदर पैसा मेहकरात खेळता राहत नाही.त्यामुळे ही बाब शहर विकासासाठी चिंतेचा विषय ठरली आहे. मेहकर शहर हे मुंबई ते नागपूरचे मध्यवर्ती केंद्र आहे.मेहकरचा शारंगधर बालाजी, जवळ असलेले जागतिक दर्जाचे लोणार सरोवर आणि शहराला लागून गेलेला हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग, छत्रपती संभाजी नगर, पुणे, तर जवळच असलेला मराठवाडा यामुळे मेहकरचा झपाट्याने विकास होत आहे.परंतु शहरातील जनता खाण्यापिण्याच्या साहित्यासह इतरही आवश्यक साहित्य ऑनलाईन मागवीत असल्याने दर दिवसाला १ कोटी रुपयांची उलाढाल होत आहे. त्यामुळे मेहकरातील पैसा गायब होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

# घरकुल द्या हो... म्हणत वृद्धाने केले विष प्राशन, प्रकृती गंभीर !

जनसंचलन/ खामगाव

शासकीय जागेत घरकूल बांधून द्या, जिल्हा परिषद शाळेच्या बाजूला असलेले अतिक्रमण हटवा, या मागणीसाठी तालुक्यातील कोलोरी येथील ६६ वर्षीय वृद्धाने पंचायत समितीच्या प्रवेशद्वारात विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार मंगळवारी सकाळी ११ वाजता घडला. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. वृद्धाला पोलिसांनी तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असून, अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तालुक्यातील कोलोरी येथील टिकार (६६) यांनी सरपंच, सचिव तसेच पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांकडे सातत्याने निवेदने दिली. त्यामध्ये गावातील शासकीय जागेत घरकुल बांधून द्या, तसेच जिल्हा परिषद शाळेच्या बाजूला असलेले अतिक्रमण काढण्याची मागणी केली. ग्रामपंचायत, पंचायत समितीच्या उरितामी दिव्यांग टनावश शेषगत तरिष्ठांनी मागणीकरे टर्नश केल्याचा थाटे आरोप टिकार यांनी केला आहे. त्यासाठी पंचायत समिती आवारात आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. त्यामुळे मंगळवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास विष प्राशन केले. पंचायत समितीच्या प्रवेशद्वारातच टिकार यांची प्रकृती बिघडली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी त्वरित वृद्धाला खामगाव येथील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहे.

# करडीनजीक २५ ब्रास रेतीचा अवैध साठा जप्त

जनसंचलन/धाड

धाड येथून जवळच असलेल्या करडीनजीक फाट्यावर ६ जानेवारी रोजी बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे यांच्यासह महसूलच्या पथकाने २५ ब्रास रेतीचा अवैध साठा जप्त केला. करडी गावाच्या फाट्यावर सावळी रोडवरील एका प्लॉटिंगच्या जागेवर दोन ठिकाणी रेतीचा अवैध साठा आढळून आला. तहसीलदार विठ्ठल कुमरे व त्यांचे सहकारी कर्मचारी धाड परिसरात पाहणी दौऱ्यावर असताना त्यांना रेतीचा साठा केल्याचे दिसून आले. त्यावरून त्यांनी कार्यवाही केली. पंचनामा करीत रेतीसाठा कोणाच्या मालकीचा आहे, याचा शोधा घेण्याच्या सूचना तलाठी, मंडळाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. परिसरात प्रामुख्याने रेतीसह मुरूम, डबराचे अवैध उत्खनन आणि तस्करी वाढल्याचे चित्र आहे. हा रेतीसाठा नेमका कोणाचा, याचा शोध घेतला जात असून, संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाईल, असे तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी सांगितले.

# साखरखेर्डा लुटमारप्रकरणी सहा जणांना अटक


## पिस्तुलासह दीड लाखांची रोकड जप्त...

जनसंचलन/ साखरखेर्डा

येथून जवळच असलेल्या काळापाणी शिवारात मायक्रो फायनान्सच्या दोन कर्मचाऱ्यांकडील १ लाख ४१ हजार ८६८ रुपयांची रोख रक्कम लुटल्याप्रकरणी पोलिसांनी सहा आरोपींना ६ जानेवारी रोजी अटक केली. त्यांच्याकडून रोख रकमेसह दोन दुचाकी, पिस्तुल जप्त करण्यात आली आहेत. या सहाही आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पवन नारायण हागे (२७) आणि त्यांचा सहकारी विश्वजीत वानखेडे हे दिवसभर जमा केलेली रक्कम ४ जानेवारी रोजी मेहकर येथे कंपनीत जमा करण्यासाठी नेत असताना त्यांना काळापाणी शिवारात दुचाकी आडवी लावून




लुटण्यात आले होते. रात्री ८:०० वाजताच्या सुमारास ही घटना घडली होती पैसे लटन चोरयांनी साखरखेर्ड्याच्या दिशेने धूम ठोकली होती. याप्रकरणी ५ जानेवारी रोजी साखरखेर्डा पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. त्यानंतर साखरखेर्डा पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पवन हाणेंनी सांगितलेल्या वर्णनानुसार आरोपीचा शोध घेत गणेश दादाराव गवई यास ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखविल्यानंतर गुन्ह्यात सहभागी मंगेश रवींद्र गवई (२२), विलास केशव खरात (२८), अंकित दत्तात्रय जगताप (२३), आविष्कार तुषार गवई (२२), अभिमन्यू रामभाऊ मंडळकर (२३, सर्व रा. साखरखेर्डा) या सर्वांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख १ लाख ४१ हजार ६८६ रुपये आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेले पिस्तूल व शस्त्र जप्त करण्यात आले. आरोपींची सिंदखेड राजा न्यायालयाने तीन दिवसांची दिवसांच्या पोलिस कोठडीत रवानगी केली आहे




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958